Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 2.1506(UIF)
Volume-4 | Issue-5 | June-2014
Available online at www.isrj.net

सर्वसमावेशक शिक्षणामध्ये सामान्य विद्यार्थ्यांच्या बरोबर विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना सामावून घेत असताना शिक्षकांची भुमिका

डॉ.सौ. उज्ज्वला के.सदावर्ते
प्राचार्या,विवके वर्धिनी अध्यापिका महाविद्यालय,नांदेड
तथा,अधिष्ठाता,शिक्षणशास्त्र विद्याशाखा,स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.

सारांश :-

समावेशक शिक्षण म्हणजे शिक्षण प्रवाहात सर्वांचा समावेश. समावेशक शिक्षणामुळे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना व शारीरिक भिन्नता असणाऱ्या विद्यार्थ्यांना घरापासून जवळच्या शाळेतच शिक्षणाची संधी मिळते व अशी मुले शिक्षणापासून वंचित न राहता शिक्षणाच्या प्रवाहात येतात.

विविध प्रकारची भिन्नता असणाऱ्या बालकांकडे भेदभावाच्या दृष्टिकोनातून पाहण्याच्या वृत्तीशी लढा द्यायचा असेल तर त्यांना नियमित शाळेमध्ये समावेशक शिक्षण देणे हा योग्य उपाय आहे. त्यातून सर्वासाठी शिक्षण प्रत्यक्षात येऊन सर्वांचा स्वीकार करणारा, समावेशक समाज निर्माण होण्यास मदत होईल आणि बहुसंख्य बालकांना प्रभावी शिक्षण मिळेल व एकूणच शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल होतील.

प्रास्ताविक

बार्टन यांच्या मते, सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे भिन्नतांना प्रतिसाद देणे, अपरिचित आवाज ऐकणे, मुक्त व स्वीकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, सर्वाना सक्षम बनवणे व भिन्नतांना प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे.

वास्तविक शारीरिक, मानसिक भिन्नता असणाऱ्यांनी स्वतंत्र व विशेष शाळांमध्ये शिकणे ही गोष्ट रुढ झाल्यावर समावेशक शिक्षणाचा विचार प्रारंभी आव्हानात्मक वाटतो. विविध क्षमता असणारे विद्यार्थी सामान्य शिक्षणक्रम व पध्दतींशी जुळवून घेण्यास असमर्थ आहेत असा विचार येऊ शकतो. पण असमर्थता बालकात नसून ताठर शिक्षणप्रणालीमध्ये आहे.

सर्व विद्यार्थ्याना एकच समान अध्ययन-अनुभव मिळण्याच्या दृष्टीने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध क्षमतांमधील व त्यांच्या अध्ययन शैलीतील फरक समजून घेतले पाहिजेत. या तंत्राला भेदाभेद तंत्र काही बदल करुन वापरण्यात येते. वर्गात अनेक प्रकारचे बदल करता येतात. अर्थात हे बदल विद्यार्थ्यांच्या गरजा, शिक्षकांच्या ज्ञानाची पातळी आणि शाळेतील शिक्षक-मुख्याध्यापक यांच्या मदतीवर अवलंबून असू शकतात. लहान किंवा मोठा बदल हा वर्गातील विद्यार्थ्यांच्या खास गरजांमध्ये निश्चित फरक करतो.

समावेशक शिक्षणाला सुलभ व सुगम करण्याच्या दृष्टीने शिक्षकांना पुढील दहा सोपे बदल करता येतात.



सर्व प्रकारच्या मूलांच्या गरजांच्या पूर्ततेसाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. सामान्य वर्गात शिक्षक, मित्र, मार्गदर्शक, तत्वज्ञ या भूमिकेतून काम करत असतो. पण समावेशक वर्गात या भुमिकेशिवाय वेगळया भूमिका त्याला पार पाडाव्या लागतात. प्रामुख्याने विशेष गरजा असलेल्या बालकाला समजून घेणे, त्याच्या क्षमतेप्रमाणे विकासाच्या त्याला संधी देणे, त्याच्यातील सूक्ष्म गुणांना वाव देऊन त्याला सृजनात्मक बनविणे, त्यासाठी पालकांचे सहकार्य घेणे, समाजातील इतर घटकांना या बालकांच्या विकासासाठी सामावून घेणे या भूमिका समावेशक वर्गात शिक्षकाला महत्वाची आहे. ज्या भूमिका शिक्षकाला पार पाडाव्या लागतात. त्यातील काही महत्वाच्या भूमिका खालीलप्रमाणे आहेत.

T

समावेशक शिक्षणात शिक्षकांची भूमिका :



1. विशेष बालक ओळखणे :

सर्वात प्रथम शिक्षकाला विशेष बालक ओळखता आले पाहिजे. तसेच ते विशेष बालक कोणत्या प्रकारात मोडते हे पाहून त्याला आवश्यक त्या सोयी-सुविधांची माहिती देता आली पाहिजे. त्या बालकाच्या विविध गरजांचा परिचय शिक्षकाने करुन घेऊन त्याची पुर्तता केली पाहिजे. गरजांच्या पुर्तीसाठी शैक्षणिक साधने तयार करणे.

विशेष बालकांचे प्रकार आणि ओळख

1.1 अंधदृष्टिदोष बालक :

डोळयातून पाणी येणे. वारंवार डोळे लाल होणे. वरवरचे डोळे चोळणे. वरवरचे डोळे मिचकवणे. डोळे लाल होऊन वारंवार डोळे दुखण्याच्या तक्रारी येणे. डोळे सारखे खाजवणे. डोळयातून नेहमी घाण येणे. बुबळावर भूरी किंवा डाग आहे. विविध रंगातील फरक न ओळखता येणे. रातआंधळेपणा. एका डोळयाने अंध आहे. दोन्ही डोळयाने अंध आहे. वस्तूवर, लोकांवर वारंवार आदळतो. एक डोळा झाकतो व डोके पुढे करतो. कोणतीही वस्तू अथवा पुस्तकदेखील डोळयाजवळ धरुन पाहतो. फळयावरील लेखन उतरवून घेताना इतर मुलांना विचारतो. सारखी डोळयाशी संबंधित काम केल्यामुळे डोके दुखते अशी तक्रार करतो. दोन डोळयापैकी एका डोळयाचा आकार मोठा अथवा लहान दिसतो. डोळयांची बुबळे वरखाली हलतात का ? चालताना चाचपडतो का ? फळयावरील मजकूर आपल्या वहीत उतरवण्यासाठी फळयाजवळ जाऊन लिहीतो का ? या वरील सर्व गोष्टीवरुन व निरीक्षणावरुन आपण अंध बालकास ओळखू शकतो.

1.2 कर्णबधिर बालक :

कान फुटतो/वाहतो. वारंवार कानात दुखत असल्याची तक्रार करतो. वारंवार कान खाजवतो. नीट ऐकायला यावे या हेतुने बोलणाऱ्याच्या दिशेने तोंड वळवितो. दिलेल्या सूचना (तोंडी) पुन्हापुन्हा सांगण्यासाठी विनंती करतो. शिक्षक ज्यावेळी वर्गात एखादी गोष्ट उतरवून घेण्यास तोंडी सांगतात त्यावेळी शेजारच्या मुलांची सतत मदत घेतो. वर्गात शिक्षकाने सांगितलेले एकुण स्वर/ व्यजना बाबत लिहून घेताना अनेक चुका करतात. शिक्षक शिकवताना त्यांच्या ओठांकडे काळजीपूर्वक पाहतो. शेजारच्या विद्यार्थ्यांची वही वारंवार मागतो/ पाहतो. पाठीमागून बोलले गेल्यास समजत नाही. विचारलेल्या प्रश्नांची असंबध्द उत्तरे देतो. टि.व्ही., रेडिओ यांचा आवाज खूप मोठा ठेवतो. शाळेत लक्ष देत नाही/ इच्छा असेल तरच ऐकतो अशी तक्रार आपल्याला विद्यार्थ्यांबद्दल / मुलांबद्दल वारंवार येते. बोबडे बोलतो. वारंवार सर्दीमुळे कमी ऐकु येते. या वरील सर्व गोष्टीवरुन आपल्याला कर्णबधिर बालकांचा शोध घेता येतो अथवा त्यांना ओळखता येते.

1.3 वाचादोष बालक :

शब्द आणि वाक्ये यामध्ये वारंवार अडखळतो. शिक्षकांने वारंवार सुधारण्याचा प्रयत्न करुनही सदोष उच्चारण करतो. बोलताना शब्दातील अक्षरे/वाक्यातील शब्द गाळतो. बोलण्यात तोतरेपणा आढळतो. अस्पष्ट उच्चार करतो.सर्वसामान्य, समवयस्क मुलांच्यासारखे बोलतो का ? समवयस्क मुलांप्रमाणे प्रसंगानुक्रम भाषा वापरतो का ? या सर्व कारणांवरुन वाचादोष बालकांची ओळख आपल्याला करता येते.

1.4 अपंगत्व (हालचालीतील विकलांगत्व) बालक :

लक्षात येण्याजोगे व्यंग आहे. मानेत, चेहऱ्यावर, हातात, मनगटात, छातीत, बोटात, कमरेत, पायामध्ये पाठीच्या कण्यामध्ये, बसताना, उभे राहताना त्रास होतो. वस्तू उचलताना, धरताना (पकडताना) आणि जमिनीवर ठेवताना अवघड जाते. सांध्यामध्ये दुखते अशी वारंवार तक्रार करतो. लिहीताना पेन/पेन्सिल धरताना त्रास होतो. हेलकावे देत चालतो/नीट चालता येत नाही. निर्हेतूक पाय हलवितो/ विनाकारण पायाची हालचाल करतो. पाय/हात कापलेले आहेत. उभा असताना किंवा बसत असताना अनियंत्रित शारीरिक हालचाली करतो. यावरुन आपण अपंगत्व बालकांचा शोध घेऊ शकतो.

1.5 मतिमंद बालक :

प्रथम दृष्टिक्षेपात डोळे/नाक यात जाणवणारा फरक आहे का ? जेवण करणे, कपडे घालणे, अंघोळ करणे, इतर दैनंदिन विधी आटोपणे आणि व्यवस्थित राहणे अशा गोष्टी स्वतःच्या स्वतः करताना मुलाला अवघड/त्रासाचे होते का ? एखादी गोष्ट कर असे सांगितले असता त्याला सांगितलेले समजले नाही असे आढळले क ? समवयस्क मुलांशी तुलना करता त्याला कोणत्याही गोष्टी शिकणे अवघड जाते का ? कल्पनेतील अमूर्त गोष्टीपेक्षा प्रत्यक्ष मूर्त गोष्टी तुलनेने त्याला अधिक समजू शकतात का ? इतर समवयस्क मुलांच्याप्रमाणे वर्गातील उपक्रमात तो भाग घेतो का ? या सर्व कारणांवरुन आपण मतिमंद बालकांचा शोध घेऊ शकतो.

1.6 अध्ययन अक्षमता :

आपले काम नीटपणे करणे अवघड जाते परिणामी त्याची वहया, पुस्तके अव्यवस्थित असतात आणि वर्गातील कामे

इतरांपेक्षा उशिरा करतो. आजूबाजूला घडणाऱ्या घटनांना किंवा व्यक्तींना भराभरा प्रतिसाद देऊ शकत नाहीत आणि मंद आहे असे वाटते. वरवर मनाच्या अस्थिर (अस्वस्थ) चंचल क्षुब्ध अवस्थेमुळे तो काम समाधानकारकरित्या पुरे करु शकत नाही. वेंधळेपणामुळे किंवा गबाळेपणामुळे वस्तू पडतात अगर शिस्तीने काम करण्यात अपयश येते. वाचताना, ऐकताना वाक्य गाळतो किंवा ओळी पुन्हापुन्हा वाचतो. वर्णाचा उच्चार वेगळा करतो जसे स ऐवजी श, फ ऐवजी प , र ऐवजी ड, वाचताना उताऱ्यात भूतकाळ वापरलेला असेल तर वर्तमानकाळ वापरुन वाचतो, जसे होतो ऐवजी आहे, कांता ऐवजी टांगा. शब्द उलटे करुन वाचतो जसे पिशवी ऐवजी पिवशी, कपडे ऐवजी कडपे. शब्दातील अक्षरांचा क्रम बदलून वाचतो जसे हिरवा ऐवजी हिवरा. मोठया शब्दातील अक्षरांचा क्रम बदलून वाचतो जसे संग्रहालय ऐवजी संग्रालय, ग्रामपंचायत ऐवजी ग्रामपंचात. सारखे दिसणारे शब्द चुकिचे वाचतो. घर-धर, मात-भात. अंक चुकीचे वाचतो. ३ ऐवजी ६, १४ ऐवजी ४१ कोणतेही शारीरिक व्यंग नसताना बुध्दयांक चांगला असतानाही सर्वसामान्य मुलांसारखी शैक्षणिक प्रगती करु शकत नाही. या सर्व संबोधावरुन अध्ययन अक्षमता असणाऱ्या बालकाची ओळख आपण घेऊ शकतो.

2. पालकांच्या संदर्भात शिक्षकांची भूमिका :

- पालक आणि शिक्षक यांच्यात माहितीची देवाण घेवाण होण्यासाठी पालक सभा घेणे.
- शिक्षकांनी पालकाकडून सहकार्य मिळवण्यासाठी सदैव तत्पर असावे.
- विद्यार्थ्यांच्या आवडी निवडी शिक्षकांनी पालकाकडून जाणून घ्याव्यात.
- पालकांनी पाल्यांशी कशा प्रकारची वर्तणूक करावी याचे मार्गदर्शन शिक्षकांनी करावे.
- विशेष गरजा असणारे बालक आपल्या पोटी जन्माला आले म्हणून पालक नशिबाला दोष देतात, त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात अशा वेळी शिक्षकांनी त्यांचे प्रबोधन करावे.
- अकार्यक्षम बालकांचा स्वीकार करण्यासाठी पालकांना मानसिकदृष्टया तयार करावे.
- पालकांचे समुपदेशन करावे.
- पालकांसाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करावे.
- पालकांच्या उद्‌बोधनासाठी कार्यशाळांचे आयोजन करावे.

3. मूल्यमापनाच्या दृष्टीने शिक्षकांची भूमिका :

- अध्ययन अकार्यक्षम असणाऱ्या बालकांच्या गरजेप्रमाणे मूल्यमापन योजना लवचिक असावी.
- अशा बालकांसाठी प्रश्नपत्रिकाच वेगळया स्वरुपाची असावी.
- परीक्षेसाठीचा कालावधीही जास्त असावा.
- वस्तुनिष्ठ प्रश्नांचा समावेश जास्त असावा.
- गुणदान योजना लवचिक असावी.
- ज्यांना लेखनिकांची गरज आहे त्यांना लेखनिक पुरवावा.
- हुशार विद्यार्थ्यांना अशा विद्यार्थ्यांना अध्ययनात मदत करण्यास सांगणे.
- कृतीवर अधिक भर द्यावा.

4. शिक्षकांची अध्यापनाबाबतची भूमिका :

- विविध अध्यापन पध्दतीचा वापर शिकवताना शिक्षकांनी करावा.
- कृतीयुक्त अध्यापन शैलीचा वापर मोठयाप्रमाणात करावा.
- चर्चा पध्दती व परिसंवाद यावर भर द्यावा.
- विद्यार्थ्यांनुरुप अध्यापन पध्दतीचा वापर शिक्षकांनी करावा.
- विविध शैक्षणिक साहित्याचा वापर अध्यापनात करावा.
- मनोरंजनात्मक पध्दतीचा वापर अध्यापनात करावा.
- वर्गातील वातावरण खेळीमेळीचे असावे.
- भौतिक सोयी-सुविधांचा पुरवठा मोठयाप्रमाणात करावा.

संदर्भग्रंथ सूची :

१.जगताप ह.ना., (संपादित) (१९९५) शैक्षणिक मानसशास्त्र, पुणे, अनमोल प्रकाशन.
२.भोसले संभाजी, इनामदार इरफान, (२००६) अध्ययनार्थीचे मानसशास्त्र, कोल्हापूर, समृध्दी प्रकाशन.
३.प्रेरणा, अपंग समावेशित शिक्षण प्राथमिक मार्गदर्शिका, २००१६

डॉ.सौ. उज्ज्वला के.सदावर्ते
प्राचार्या,विवके वर्धिनी अध्यापिका महाविद्यालय,नांदेड
तथा,अधिष्ठाता,शिक्षणशास्त्र विद्याशाखा,स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.